१.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

कारागृह व सुधारसेवा विभाग

सुधारणा व पुनर्वसन
फोन क्र : (०२०) २६१२३५६३
फॅक्सक्र: (०२०) २६१२५८७८
Email-igoffice.ddo-mh@gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे ४११ ००१

373

जा.क्रं.अपोमसंवकामनि/लेखा/ सन-2022-23 शिष्यवृत्ती-बक्षिस/ /२०२५,कक्ष-५,दिनांक8/०१/२०२५

**विषय-** सन-२०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी कुटुंब कल्याण निधीतुन अधिकारी / कर्मचारी यांच्या मुला-मुलींना शिष्यवृत्ती व बक्षिस रुपाने आर्थिक मदत देणेबाबत.

**संदर्भ-**दिनांक-०३.१२.२०२४ रोजी मध्यवर्ती समितीच्या बैठकीतील निर्णय

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की,कारागृह विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या मुला-मुलींना प्रत्येक वर्षी शिष्यवृत्ती व बक्षिस वाटप करण्यात येते.**सन- २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात काही अपरिहार्य कारणास्तव जे अधिकारी / कर्मचारी त्यांच्या मुलां-मुलींचे शिष्यवृत्ती व बक्षिस करिता कार्यालयास अर्ज सादर करु शकले नाही.**अशा अधिकारी / कर्मचारी यांच्या पात्र मुलां-मुलींना शिष्यवृत्ती देणे बाबत दिनांक-03/12/2024 रोजी मध्यवर्ती समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. तरी प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे कार्यालय व अधिनस्त कारागृहातील पात्र अधिकारी/कर्मचारी यांना सदरची बाब निर्दशनास आणून द्यावी व याबाबतचे प्रस्ताव **एकत्रित संकलित** करुन सोबत जोडलेल्या निकषानुसार शिफारशीसह **दिनांक १४/०२/२०२५** पूर्वी मुख्यालयास न चुकता सादर करण्यात यावे.सोबत जोडलेल्या निकषाप्रमाणे सदरचे प्रस्ताव **एकत्रित संकलित** करुन सादर करण्याची प्रादेशिक प्रमुख यांची राहिल व सन-**२०२२-२०२३** या शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती व बक्षिस प्राप्त अधिकारी / कर्मचारी यांचे अर्ज दूबार प्राप्त होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी कार्यालय प्रमुख यांची राहील.

**तसेच दिनांक १४/०२/२०२५ नंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

8/1/25

(प्रशांत बुरडे)
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य,पुणे-१

प्रति,

**१.**विशेष पोलीस महानिरीक्षक (का) मध्य विभाग ,छ.संभाजीनगर / नाशिक विभाग,नाशिक
**२.**कारागृह उपमहानिरीक्षक,पश्चिम विभाग,पुणे/ पुर्व विभाग,नागपुर/ दक्षिण विभाग,मुंबई
**३.**प्राचार्य,दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविदयालय,येरवडा,पुणे-06
**४.**सर्व कक्ष अधिकारी ,अपोमस व कामनि कार्यालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-01
**५.**कक्ष अधिकारी कक्ष-13 (ई-सेल) अ पो म व का व सु से यांचे कार्यालय,महाराष्ट्र राज्य ,पुणे-01 ई-मेल व कारागृह संकेतस्थळावर प्रसिध्दी साठी

**सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षासाठी कुटुंब कल्याण निधीतून बक्षिस व शिष्युवृत्ती वाटप करणेसाठी खालील निकष नमुद करण्यात आले आहेत.**

१) दहावी ते बारावी आणि पदवी,पदव्युत्तर या अभ्यासक्रमासाठी प्राप्त होणारे अर्जातील खालील निकषानुसार पात्र अधिकरी/कर्मचा-यांचीच माहिती खालील प्रपत्रात अभ्यासक्रम निहाय क्रमाने माहिती **Microsoft Excel sheet** मध्ये **DV-TTsurekh** या फॉन्टमध्ये तयार करुन सी.डी.मध्ये पाठवावी.

| अ.क्र | कार्यालयाचे नांव | अधिकारी/ कर्मचारी नावं | पदनाम | मुलाचे/मुलीचे नांव | शैक्षणिक अभ्याक्रम | उत्तीर्ण वर्ष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | |
| | | | | | | | |
| एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | प्राविण्य विषय | शिष्युवृत्ती रक्कम | बक्षिस रक्कम | एकूण (12+13) | प्रादेशिक कार्यालय प्रमुखंची शिफारस |
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |

**२) शैक्षणिक अभ्यासक्रमः-**

**अ) इयत्ता १० व १२ वी पर्यत पात्रताः-**

कला व वाणिज्य शाखेसाठी प्रथम श्रेणी ६०%,विज्ञान शाखेसाठी ७०% किंवा त्या पुढीलसाठी शिष्युवृत्तीसाठी रुपये **३,०००/-**तसेच एखाद्या विषयात प्राविण्य असल्यास कला/वाणिज्य शाखेसाठी ७५ % , विज्ञान शाखेसाठी ८० % किंवा त्यापुढील साठी बक्षिस रुपये **२,०००/-** पर्यत देण्यात येईल. **(एकुण गुण व प्राविण्य विषय हे दोन निकष पुर्ण करत असेल त्यांना रक्कम रुपये पाच हजार देण्यात येईल ,एका पेक्षा जास्त विषयात प्राविण्य गुण मिळाल्यास फक्त एकच विषय ग्राहय धरावा)**

**ब) सर्व शैक्षणिक पदवी व पदव्युत्तर,पदविकाः-**

**(कला,वाणिज्य,विज्ञान,अभियांत्रिकी,वैद्यकीय) :**-प्रथम श्रेणी ६०% व त्यापुढील साठी फक्त शिष्युवृत्ती रुपये ३,०००/-पर्यत देण्यात येईल.**(या मध्ये प्राविण्य हा निकष विचारात घेवु नये)**

**३)** सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील **दिनांक १/७/२०२२ ते ३०/६/२०२३** या कालावधीतील पात्र गुणपत्रिकानुसार अधिकारी/कर्मचा-यांचे अर्ज विचारात घेतले जातील.

**४)**सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षासाठी पदवी,पदव्युत्तर,पदविका या अभ्यासक्रमाच्या निकालाच्या गुणपत्रिकेतील दि.१/७/२०२२ ते ३०/६/२०२३ पर्यत असतील अशाच अधिकारी /कर्मचा-यांचे अर्ज ग्राहय धरावे.

५) वरील अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेत दि.१/७/२०२२ व त्यापुढील दिनांक असल्यास अशा कर्मचा-यांचे अर्ज व दिनांक ३०/७/२०२२ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना दि.१/७/२०२२ ते ३०/६/२०२३ या कालावधीत पात्र असलेल्या गुणपत्रिकानुसार लाभ मिळणेसाठी त्यांचेही अर्ज स्वतंत्र पाठवावे.

६)पदवी,पदव्युत्तर,पदविका या अभ्यासक्रमाच्या अंतिम निकालाची गुणपत्रिका विचारात घेण्यात यावी.**सेमीस्टर किंवा इतर मध्यावधी चाचण्यांचे निकाल/गुणपत्रिका विचारात घेण्यात येवू नये.**

७)मुख्यालयाने दिलेल्या तक्यामध्ये कोणताही नवीन कॉलम आपले स्तरावर वाढविण्यात येवू नये व मर्ज **(कमी)** करण्यात येवू नये असे केल्याचे निर्दशनास आल्यास असा प्रस्ताव मुख्यालयस्तरावर दप्तरी दाखल करण्यात येईल व याबाबत आपले कार्यालयास कोणतेही लेखी स्वरुपात कळविण्यात येणार नाही.

८)सेवानिवृत्त, रजेवर अथवा निलंबित असलेल्या कर्मचा-यांना विहित मुदतीत अर्ज सादर करणेबाबत समज देण्यात यावी.

९)कारागृह व सुधारसेवा विभागातील किंवा इतर विभागातील (प्रतिनियुक्ती) अधिकारी/कर्मचारी हे कुटुंब कल्याण निधीचा सभासद (वर्गणीदार) असणा-यांचे अर्ज ग्राहय धरावे.

१०)गुणपत्रिकेची मागील व पुढील दोन्ही बाजूची स्पष्ट दिसणारी साक्षांकित केलेली छायांकित प्रत जोडावी.

११)प्रादेशिक कार्यालय प्रमुखांनी सदरचे प्रस्ताव सादर करताना ते बिनचुक व मुख्यालयाने दिलेल्या सूचनांप्रमाणे सादर करावे व ती सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी प्रादेशिक कार्यालय प्रमुखांची आहे.